*सन २००९-२०१०* **रब्बी पणन हंगामात**
**आधारभूत किंमत योजनेखाली गहू खरेदी**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: खरेदी-१००८/प्र.क्र.४१०१/ना.पु.२९**
**मंत्रालय विस्तार,मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक: २७ मे,२००९.**

**-: शा स न नि र्ण य :-**

आधारभूत किंमत योजनेंतर्गत २००९-२०१० च्या रब्बी पणन हंगामासाठी केंद्र शासनाने गव्हाचे विर्निदेश तसेच, किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे. याशिवाय आधारभूत किंमतींचा लाभ होण्याचे दृष्टीने व शेतक-यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल ) गहू विकावा लागू नये यासाठी राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष उघडण्याच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार, **राज्यातील शेतक-यांना किमान आधारभूत किंमतीचा लाभ मिळावा** या हेतूने राज्यात खरेदी केंद्रे उघडण्याकरिता व त्या ठिकाणी गव्हाची खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

***१) खरेदी बाबत निर्णय :-***

(अ) संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्र शासनाची "नोडल एजन्सी" म्हणून भारतीय अन्न महामंडळ (FCI) काम पाहील.

(ब) प्रत्यक्ष खरेदीची प्रक्रिया बिगर आदिवासी क्षेत्रात **"महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिग फेडरेशन"** व आदिवासी क्षेत्रामध्ये **"आदिवासी विकास महामंडळ"** या अभिकर्त्यांमार्फत करण्यात यावी.

(क) राज्य शासनाने भारतीय अन्न महामंडळाच्या वतीने काम पहावे व अनुक्रमे मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाने **राज्य शासनाचे मुख्य अभिकर्ता** म्हणून काम पहावे.

(ड) गहू खरेदीच्या स्तरापर्यन्तच्या सर्व प्रकारच्या कार्यवाहीची जबाबदारी खरेदी अभिकर्त्यांवर राहील.

(इ) खरेदी केलेला गहू भारतीय अन्नमहामंडळाकडे जमा करण्यात यावा.

(उ) खरेदी अभिकर्त्यांने संभाव्य /प्रत्यक्ष खरेदी केंद्राची यादी तातडीने भारतीय अन्न महामंडळास उपलब्ध करुन दयावी. व त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाने आवश्यकतेप्रमाणे गोदामाची उपलब्धतता करुन दयावी. अभिकर्त्याने खरेदी केलेला गहू केंद्र शासनाच्या विनिर्देशानुसार असल्याची खातरजमा गोदामात साठवणूक करण्यापूर्वी भारतीय अन्न महामंडळाने करावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र अभिकर्त्यांस देण्यात यावे.

**२) अभिकर्ता नेमणूक :-** उपरोक्त निर्णयानुसार, राज्यात [I] **बिगर आदिवासी क्षेत्रात** *२००९-२०१०* **या** रब्बी पणन हंगामात आधारभूत किंमत योजनेंतर्गत गहू खरेदी

करण्याकरिता, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशनला या शासन निर्णयान्वये मुख्य अभिकर्ता म्हणून नेमण्यात येत आहे. या क्षेत्रात सर्व प्रापणाची कार्यवाही मार्केटिंग फेडरेशनने करावी.

[II] **एकात्मिक आदिवासी विकास क्षेत्रामध्ये** आधारभूत किंमतीने गव्हाची खरेदी करण्याकरिता आदिवासी विकास महामंडळाची मुख्य खरेदी अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(अ) आदिवासी विकास महामंडळाने गव्हाचे प्रथम एकाधिकार योजनेखालील दर निश्चित करावेत.

(ब) जर हे दर आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असतील तर महामंडळाने या गव्हाची एकाधिकार योजनेखाली खरेदी करावी.

(क) मात्र जेव्हा असे निश्चित केलेले दर आधारभूत किंमतीपेक्षा कमी असतील त्या कालावधीत आधारभूत किंमतीने खरेदी करावी व गहू भारतीय अन्न महामंडळाकडे हस्तांतरीत करावा.

(ड) एखाद्या एकात्मिक आदिवासी क्षेत्रात एकाधिकार खरेदीकरिता एखादे पीक अधिसूचित विनिर्दिष्ट नसले तरी, असा गहू आधारभूत किंमत योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आल्यास आदिवासी विकास महामंडळाने अशी खरेदी करणे या योजनेअंतर्गत करणे आवश्यक राहील.

**३) आधारभूत किंमती, सर्वसाधारण गुणवत्ता व दर्जा :-**

( किंमत रुपये / प्रति क्विंटल )

| अ. क्र. | पीक | आधारभूत किंमत (रुपये प्रति क्विंटल) | शेतकऱ्यांना प्रत्यक्ष द्यावयाचा दर (रूपये प्रति क्विंटल) | **गुणवत्ता दर्जाचे विनिर्देश** |
|---|---|---|---|---|
| १ | गहू (एफ.ए.क्यू) | १०८०/- | १०८०/- | **जोडपत्र अ प्रमाणे** |

गुणवत्ता दर्जाच्या प्रमाणापेक्षा गव्हामध्ये उपद्रव्याचे प्रमाण जास्त आढळल्यास ते अभिकर्त्यांने खरेदी करु नये. कोणत्याही परिस्थितीत विनिर्देशात न बसणा-या (कमी दर्जाच्या) गव्हाची खरेदी करता कामा नये. यासाठी अभिकर्ता पूर्णत: जबाबदार राहील. कमी दर्जाचे गहू खरेदी झाल्यास व त्यामुळे काही तोटा आल्यास किंवा कोणतीही समस्या उद्‌भवल्यास अभिकर्ता पूर्णत: जबाबदार राहील.

आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत गव्हाच्या खरेदीच्यावेळी दर्जा संबंधी किंवा भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यापूर्वी तपासणीमध्ये काही दोष आढळल्यास याबाबत अभिकर्ता संस्था संपूर्णपणे जबाबदार राहील. तसेच यामध्ये प्रकरणपरत्वे सुधारणात्मक कार्यवाही अभिकर्ता संस्थेनेच करावयाची असून अशा कार्यवाहीमुळे झालेल्या नुकसानीस अभिकर्ता संस्था संपूर्णत: जबाबदार असतील.

**४) आर्द्रता:-** केंद्र शासनाने हंगाम २००९-२०१० करीता आर्द्रतेचे अधिकतम प्रमाण गव्हासाठी १४% इतके विहित केले आहे. या प्रमाणापेक्षा आर्द्रता जास्त आढळल्यास गव्हाची खरेदी

करण्यात येऊ नये. मात्र, गव्हाच्या आर्द्रतेच्या विहित प्रमाणात असल्याची खात्री करुन ते स्विकारल्यानंतर **आर्द्रता कटती लावू नये.** त्यामुळे, अभिकर्त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या गव्हाची पूर्ण आधारभूत किंमत कोणत्याही कटती शिवाय प्रदान करावी. कोणत्याही स्थितीत जास्त ओलसर किंवा बुरशीयुक्त गहू खरेदी करु नये. गहू स्वच्छ व कोरडे असून ते विक्री योग्य (मार्केटेबल ) असल्याचे अभिकर्त्याने खातरजमा करावी.

**५) सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

५.१. खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या गव्हाच्या किंमतीतून, मुख्य खरेदी अभिकर्ता, सहकारी संस्थांच्या कर्जापोटी शेतकऱ्यांकडून ४० टक्के पर्यन्त कर्जाची रक्कम वसूल करु शकेल. (टंचाई परिस्थितीत त्या संबंधातील आदेशांच्या अधिनतेने )

५.२. आधारभूत किंमत योजनेखाली गहू खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळास जो अनुषंगिक खर्च द्यावयाचा आहे, त्याबाबत शासन भारतीय अन्न महामंडळाशी व केंद्र शासनाशी चर्चा करुन स्वतंत्रपणे निर्णय घेईल व हा निर्णय स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. परंतु या आदेशाची वाट न पहाता मार्केटिंग फेडरेशनने / आदिवासी विकास महामंडळाने गहू खरेदीची योजना त्वरीत कार्यान्वित करावी.

५.३. कोणत्याही परिस्थितीत नॉन एफ.ए.क्यू.दर्जाचा गहू खरेदी करु नये. शेतक-यांच्या माहितीसाठी गव्हाचे एफ.ए.क्यू. विनिर्देश, आधारभूत किंमती आणि अस्वच्छ/खराब गहू खरेदी केला जाणार नाही, याबाबींना **स्थानिक वर्तमानपत्रे व इतर प्रसार माध्यमातून अभिकर्त्याने व जिल्हाधिका-यांनी पुरेशी प्रसिध्दी दयावी.**

५.४. आधारभूत किंमत ही एफ.ए.क्यू. गव्हासाठीच असेल. शेतक-यांनी सुकविलेले व स्वच्छ केलेला गहू खरेदी केंद्रावर आणावा म्हणजे तो नाकारला जाणार नाही, अशी व्यापक प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रातून देण्यात यावी.

**५.५ खरेदी अभिकर्त्यांनी एफ.ए.क्यू.दर्जात न बसणाऱ्या गव्हाची खरेदी केली तर त्याची संपूर्ण जबाबदारी व येणाऱ्या नुकसानीची जबाबदारी ही सर्वस्वी खरेदी अभिकर्त्यांवर राहील. कमी दर्जाचे गहू खरेदी करण्याचा प्रयत्न केल्यास अशा कर्मचाऱ्यांवर / ग्रेडर्सवर अभिकर्त्यांने सक्तीने कारवाई करावी.**

५.६. भारतीय अन्न महामंडळाचे अधिकारी खरेदी केंद्रांना भेटी देवून नियमितपणे खरेदी होत आहे किंवा नाही याची तपासणी करतील आणि त्यांनी दिलेला सल्ला विचारात घेवून खरेदी अभिकर्त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही / उपाययोजना करणे आवश्यक राहील.

५.७. **गव्हाच्या दर्जावर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री व पुरेसे प्रशिक्षित ग्रेडर्स नेमण्याची संपूर्ण जबाबदारी मार्केटिंग फेडरेशन / आदिवासी विकास महामंडळाची राहील.**

५.८. सर्व खरेदी केंद्रावर प्रशिक्षित ग्रेडर्स नेमले गेले आहेत याची जिल्हाधिकाऱ्यांनी व पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा प्रत्यक्ष भेट देवून खात्री करुन घ्यावी. ही केंद्रे चालविण्यासाठी उप अभिकर्त्यांची नेमणूक, खरेदी अभिकर्त्यांने स्वत:च्या जबाबदारीवर करावी.

५.९. जिल्हाधिकाऱ्यांनी उप अभिकर्त्यांना प्राधिकारपत्रे देऊ नयेत. शासनाचा उप अभिकर्त्याच्या नेमणूकीशी काहीही प्रत्यक्ष संबंध राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

५.१०. जिल्हाधिका-यांनी गहू खरेदीच्या कालावधीत दर्जा नियंत्रण व दक्षता पथकाची स्थापना करावी व विशेष मोहिम राबवून नॉन एफ.ए.क्यू. गव्हाची खरेदी होण्यास जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

५.११. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी (नियमन) नियम,१९६३ च्या नियम ३२(ड) अन्वये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत जाहिर करण्यात आलेल्या हमी भावापेक्षा कमी दराने शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या उत्पादनाची खरेदी केली जाणार नाही, याबाबत बाजार समितीने दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार "बाजार समितीने अशा प्रकाराना आळा घातला नाही तर त्यांच्याविरुध्द उपरोक्त नियमांच्या नियम ४५ अन्वये शासन योग्य ती कारवाई करु शकेल." **ही बाब संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या नजरेस आणून द्यावी.**

५.१२. आधारभूत किंमत योजनेअंतर्गत करण्यात येणा-या धान्यातील पूर्वानुभावानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावाने झालेल्या खरेदी संदर्भात केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे कारणमिमांसा विचारण्यात येते व याबाबत संबंधितांचा खुलासा मागविल्यावर बहुतांशी अशी खरेदी नॉन एफएक्यू दर्जाच्या धान्याची / धानाची झालेली असल्याचे दिसून येते. मात्र, अशा कमी दराने होणाऱ्या खरेदी व्यवहाराबाबत कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी संबंधिताना खरेदी विक्रीदरांची माहिती देताना /अहवाल पाठवितांना एफएक्यू / नॉन एफएक्यू दर्जाबाबत विर्निदिष्टपणे माहिती न पुरविल्यामुळे बहुतांशी प्रकरणात केंद्र शासनाकडून राज्याकडे पत्र व्यवहार करण्यात येतो. यास्तव, कोणत्याही बाजार समित्यांनी त्यांच्या क्षेत्रात खरेदी झालेल्या गव्हाचे दर कोणत्याही माध्यमाद्वारे प्रसिध्द करताना किंवा कळवितांना खरेदी विक्रीचे दराबरोबरच एफएक्यू व नॉन एफएक्यू दर्जाबाबतसुध्दा कोणत्याही परिस्थितीत उल्लेख करावा अशाही सक्त सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना दयाव्यात.

५.१३. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत जाहिर केलेल्या गव्हाच्या किंमतीबाबतचे फलक ठळक अक्षरात दर्शनी भागात लावण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी सक्त सूचना द्याव्यात व बाजार समित्यांनी याची काटेकोर अंमलबजावणी करावी. एफ.ए.क्यू.दर्जाचे गहू हमी भावापेक्षा कमी भावाने सौदे होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

६) **प्रसिध्दी :-**

६.१. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत असलेले **दर,दर्जा,विनिर्देश, खरेदी केंद्रे इ.ची माहिती** शेतकऱ्यांना निश्चितपणे लक्षात येण्यासाठी हे दर दर्शविणारे भावफलक ग्राम पंचायत, तहसिल

कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय,इ.ठिकाणी दर्शनी भागात लावण्यात यावीत. तसेच, अशा माहितीस संबंधित अभिकर्त्यांनी व जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रे, नोटीसबोर्ड, कापडी फलक इत्यादीचा वापर करण्याची कार्यवाही करावी.

६.२. खरेदी केंद्रावर गहू वाळविणे, स्वच्छ करणे तसेच गव्हाची नासधूस होवू न देणे यासाठी व खरेदी प्रक्रीया सुरळीतपणे होण्यासाठी आवश्यक त्या मूलभूत सूविधा खरेदी केंद्रावर उपलब्ध करुन देण्याची खबरदारी खरेदी अभिकर्त्याने घ्यावी.

**<u>७) खरेदी केंद्रे :-</u>**

(अ) जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देशिल्याप्रमाणे खरेदी अभिकर्त्यानी आवश्यक त्या ठिकाणी गहू खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्रे उघडावीत.

(ब) प्रत्येक खरेदी केंद्रावर खरेदी होणारा गहू निश्चित केलेल्या विनिर्देशाप्रमाणेच असणे आवश्यक आहे. परंतु प्रसिध्दी देवूनही जर एखाद्या शेतकऱ्याने विनिर्देशापेक्षा कमी प्रतीचे गहू आणले तर त्यांच्याकडून सदरहू धान्याची प्रत विनिर्देशाप्रमाणे / सुधारित करवून घेतल्यानंतरच, गहू खरेदी करावे.

(क) शेतकऱ्यांना शक्यतो आपले गहू परत घेवून जावे लागणार नाही यासाठी प्रत्येक खरेदी केंद्रावर चाळणी, पंखे,ताडपत्री,पॉलिथिन शिट्स वगैरेसारखी आवश्यक साधने उपलब्ध ठेवावीत.

(ड) खरेदीसाठी आवश्यक ती वजनमापे, आद्रता मापक यंत्रे, बारदाना, सुतळी इत्यादि साधने गहू खरेदी सुरु होण्यापूर्वी पुरेशा प्रमाणात केंद्रावर ठेवण्याची व्यवस्था करावी.

(इ) गव्हाचा नमुना तपासणीसाठी आवश्यक ती सर्व सामग्री खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष गहू खरेदी सुरु होण्यापूर्वी असणे आवश्यक आहे. खरेदी केलेले गहू साठविण्यासाठी केंद्राच्या विनिर्देशाप्रमाणे गोणी वापरण्याबाबत शासन पत्र क्रमांक खरेदी-१८०६/४७९/ प्र.क्र.३७७९/ नापु-२९, दिनांक ३० मे, २००६ अनवये दिलेल्या सूचना विचारात घेण्यात याव्यात. या गोणीचे वजन व दर्जाबाबत खरेदी केंद्राला गोणी पुरवठा होत असतांनाच, जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी स्वत: खात्री करुन घ्यावी.

(फ) जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी सुध्दा ज्या बारदानांमध्ये गहू भरलेले आहे, ती विहित प्रमाणाप्रमाणे आहे अथवा नाही याची स्वत: खात्री करुन घ्यावी. जेथे शक्य असेल तिथे बारदानांचा पुरवठा होत असतानाच जिल्हा पुरवठा अधिकारी व खरेदी अभिकर्ता प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे तपासणी करावी व त्या तपासणीत कमी प्रतीची बारदाने दिसून आल्यास नाकारावीत. कमी प्रतीचे बारदान वापरण्यात आल्याबाबत कोणतीही तक्रार शासनाकडे येणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(ग) गव्हासाठी <u>फक्त ५० किलो क्षमतेचा बारदाना</u> वापरण्यात यावा.

***<u>८) खरेदी पध्दत :-</u>***

प्रत्येक गाव एका विशिष्ट खरेदी केंद्रास जोडण्यात यावे. सदर गावातील शेतकरी जर दुसऱ्या खरेदी केंद्रावर गहू घेवून गेला तर, त्या केंद्रावर त्याचे गहू खरेदी करु नये. खरेदी केंद्रे व

प्रत्येक खरेदी केंद्रास जोडण्यात आलेल्या गावांची नावे यासंबंधी पुरेशी प्रसिध्दी देण्याबाबत जिल्हाधिकारी आणि खरेदी अभिकर्त्यांनी खबरदारी घ्यावी. शेतकऱ्यांकडील जमिनीबाबतचा ७/१२ चा उतारा पाहूनच गहू खरेदी करण्यात यावे. सदरहू उताऱ्यात गव्हाखालील क्षेत्रे याची नोंद आहे, याची खात्री करुन घ्यावी. तसेच ७/१२ उताऱ्यासंबंधी नोंद पावतीच्या मागील बाजूस घ्यावी. ७/१२ उताऱ्याची प्रत शेतकऱ्यांना परत करु नये. खरेदी केंद्रावर विक्रीसाठी शेतकऱ्यांने आणलेल्या गव्हाच्या अनुषंगाने गावनिहाय रजिष्टर तयार करावे. त्यामध्ये १) शेतकऱ्याचे नाव २) सर्व्हे / गट क्रमांक व क्षेत्रफळ, ३) केंद्रात विक्रीस आणलेला गव्हाच्या माहितीचा समावेश असावा. त्यामुळे पुन्हा गहू आणल्या बरोबर या नोंदवहीवरुन पूर्वी दिलेला ७/१२ चा उतारा काढून, शेतकऱ्यांनी आणलेला गहू त्याच्या स्वत:च्या उत्पादनातील आहे याची खात्री करुन घेता येईल. ट्रकने व लॉरीने वा तत्सम वाहनातून आणलेले गहू स्विकारण्यापूर्वी सदर धान्य खऱ्या शेतकऱ्याचेच आहे याची पूर्णपणे खात्री करुन घ्यावी. काही ठिकाणी धान्याखालील क्षेत्र व सरासरी उत्पादकता याचा विचार न करता फार मोठया प्रमाणावर (अप्रत्यक्षपणे व्यापाऱ्यांचे) धान्याची खरेदी केली जाते असे निदर्शनास आले आहे. यास्तव शेतकऱ्यांचे ७/१२ उताऱ्यानुसार पीकाखालील क्षेत्र, या वर्षीची पिक परिस्थिती (पैसेवारी) पीकाचे सरासरी उत्पादन या बाबी विचारात घेऊन, गहू खरेदी करण्यात यावे. रोज सायंकाळी खरेदी केंद्र बंद झाल्यानंतर खरेदी केंद्रावर आणलेले परंतु खरेदी न झालेले गहू सांभाळण्याची जबाबदारी शेतकऱ्याचीच राहील, अशी प्रसिध्दी द्यावी.

व्यापाऱ्यांकडून गतवर्षीचे गहू पुन्हा खरेदी केंद्रावर विकले जाण्याची शक्यता विचारात घेऊन गतवर्षाचे जुने गहू कोणत्याही स्थितीत खरीदले जाणार नाही, व केवळ शेतकऱ्यांकडून सुगी झालेले नवे गहू केवळ खरीदले जाईल याची अभिकर्त्यांनी विशेष खबरदारी घ्यावी. जुने किंवा बिगर शेतकऱ्यांकडून गहू खरेदी झाल्यास त्याची पूर्ण जबाबदारी अभिकर्त्यांवर राहील.

### ९) <u>खरेदी केलेल्या गव्हाची साठवणूक :-</u>

अभिकर्त्याने विनिर्देशानुसार खरेदी केलेले गहू शक्यतो त्याच दिवशी केंद्राजवळच्या भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामात **<u>पूर्ण वजन करुन व दर्जाची खात्री करुन</u>** जमा करावा. भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यापूर्वी सदर साठयाची सुरक्षित साठवणूक करण्याची पूर्ण जबाबदारी अभिकर्त्याची राहील. उघडयावर साठवणूक करावी लागल्यास, **परिशिष्ट "क"** मधील शासन पत्र, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक: संकिर्ण-१२९८/ १५/प्र.क्र.२५७९/ना.पु.२९, दिनांक ३ ऑगस्ट,१९९८ अन्वये विहित केलेल्या संहितेचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

आदिवासी विकास महामंडळाने त्यांचे एकाधिकार खरेदी योजने अन्वये खरीदलेले गहू हे आधारभूत किंमत योजनेखाली खरीदलेल्या गव्हापासून वेगळे ठेवावे व त्यांचे लेखेही स्वतंत्र

ठेवावे. आधारभूत किंमत योजनेखालील गव्हाची साठवणूक व थप्प्या स्वतंत्र/वेगळया ठेवाव्यात. दोन्ही योजनांचे गहू एकत्रित साठवणूक करु नये.

***१०) कलर कोडींग :-*** रब्बी पणन हंगाम २००९-२०१० मध्ये खरेदी करण्यात येणाऱ्या गव्हाच्या गोण्यांवरील कलर कोडिंग परिशिष्ट - "ड" नुसार करण्यात यावे.

**११) खरेदीचा कालावधी :-**

**दिनांक २८ मे, २००९ ते ३० जून,२००९ पर्यंत खरेदीचा कालावधी राहील.**

***१२) गव्हाची किंमत प्रदान करणे व खर्चाची प्रतिपुर्ती :-***

शासन निर्णय क्रमांक :- खरेदी-१६०५ /६७३/ प्र.क्र.३६९९/ नापु- २९,दिनांक २८ सप्टेंबर, २००५ तसेच, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: खरेदी-१६०५/६७३ /प्र.क्र.३६९९/नापु-२९, दि. १० ऑक्टोबर, २००५ अन्वये दिलेल्या सुचनांप्रमाणेच, सन २००९-१० या रब्बी पणन हंगामात देखील खरेदी केलेल्या गव्हाची देय रक्कम शेतक-यांना अदा करताना **खरेदीची रु.१०००/- पर्यंतची रक्कम रोखीने व त्यावरील रक्कम रेखांकित धनादेशाद्वारे (crossed cheques) अदा करावी.**

शासनाच्या अभिकर्त्यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या गव्हाची किंमत त्वरित प्रदान करावी. खरेदी अभिकर्त्यांना वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या कार्यालयाने, अभिकर्त्याकडून साप्ताहिक हुंडी विवरणपत्र व गहू शासकीय गोदामात प्राप्त झाल्याचा पुरावा प्राप्त होताच, खरेदी केलेल्या गव्हाची ९७ % किंमत व प्रति क्विंटल ३०/- रुपये या तात्पुरत्या दराने अनुषंगिक खर्चाची रक्कम प्रदान करावी. ही रक्कम विनाविलंब अदा करणे वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या कार्यालयाला शक्य व्हावे म्हणून धान्याची स्वीकृती पत्रे खरेदी अभिकर्त्यानी ताबडतोब दर आठवडयाला वित्तीय सल्लागार व उप सचिव यांच्या कार्यालयास सादर करावीत.

"अभिकर्त्याने या योजनेअंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या गव्हासाठी संबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्याच्या प्रती तसेच इतर मुळ अभिलेखे त्यांच्या कार्यालयात ठेवावे. गहू खरेदी प्रदानाच्या संदर्भात अतिप्रदान किंवा चुकीची देयके सादर करुन रकमा अदा केल्या जाणार नाहीत याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्त्याची राहील. अभिकर्त्याने या योजनेअंतर्गत खरेदी केल्या जाणाऱ्या गव्हासाठी वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयात प्रतिपूर्तीचे दावे सादर करतांना साप्ताहिक हुंडी विवरणपत्र, फॉर्म 'बी ' व ' सी '/भारतीय अन्न महामंडळाची स्वीकृती पावती सोबत खालील प्रमाणे प्रमाणपत्र सादर करावे ".

"प्रमाणित करण्यात येते की, दाव्यात दर्शविलेल्या रकमांचे यापूर्वी प्रदान करण्यात आलेले नाही. सदर दाव्यातील परिगणना खरेदी केंद्रे / संबंधित कार्यालयात ठेवण्यात आलेल्या मुळ अभिलेख्यावरुन पडताळणी करण्यात आलेली असून अनुज्ञेय रकमांचे दावे सादर करण्यात आलेले आहेत. सदर प्रदानात जादाची किंवा चुकीचे प्रदान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अभिकर्त्याची राहील व त्यानुसार वसुल

प्राप्त रकमा तात्काळ वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयास परत करण्यात येतील किंवा पुढील दाव्यातून वसुल करण्यात याव्यात ".

दोन्ही अभिकर्ते, आवश्यक असल्यास भारतीय रिझर्व्ह बॅकेकडून सवलतीच्या दराने कॅश क्रेडीट लिमिट मिळण्यासाठी प्रस्ताव करु शकतील. असा प्रस्ताव त्यांनी पाठविल्यास केंद्रीय अन्न मंत्रालयामार्फत अशी कॅश क्रेडिट मिळवून देण्यासाठी हा विभाग शिफारस करेल.

१३) अभिकर्त्या संस्थानी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत गव्हाच्या खरेदीबाबतचे स्वतंत्र लेखे ठेवणे व अनुषंगिक माहिती सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्या कार्यालयाकडून तात्काळ देण्यात याव्यात.

१४) खरेदी अहवाल :- संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य खरेदी अभिकर्त्यानी दर शनिवारी सायंकाळपर्यन्त करण्यात आलेल्या गहू खरेदीचा साप्ताहिक अहवाल परिशिष्ट "ब "मधील नमुन्यात पुढील बुधवारपर्यन्त पुरवठा आयुक्त, कार्यालय,मुंबई यांच्याकडे पाठवून त्याची प्रत शासनास व वित्तीय सल्लागार व उप सचिव यांना द्यावी. तसेच जिल्हानिहाय व पिकनिहाय (गहू) प्रकारनिहाय दैनिक खरेदी अहवाल फॅक्स / ई मेलने दररोज (दुसऱ्या दिवशी) शासनास सादर करावा.

१५) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक :-२७१/व्यय-४/०९दिनांक २०/४/२००९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१६) हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २००९०५२७१९०२३१००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( भै. भा. पारखी )**
**उप सचिव**
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

सहपत्र:- परिशिष्ट अ, ब, क, ड,

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
मा.मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.

मा.मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव.
मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
अतिरिक्त मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
प्रधान सचिव,कृषि व प.दु.म. विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई.
सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,
कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई- ४०० ००९
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,
आदिवासी विकास भवन,२ रा माळा, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,नाशिक-२
सर्व विभागीय आयुक्त.
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उप आयुक्त (पुरवठा),
सर्व अतिरीक्त जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.
सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई
सर व्यवस्थापक,(महा.) भारतीय अन्न महामंडळ,धिरज अरमा, २ रा माळा,
अनंत काणेकर मार्ग पोलीस स्टेशनजवळ, बांद्रा (पुर्व), मुंबई-४०० ०५१
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला, विधान भवन,मुंबई.(२प्रती)
निवड नस्ती (नापु-२९).

***********

शासन निर्णय क्रमांक **खरेदी-१००८/प्र.क्र.४१०१/ना.पु.२९, दिनांक २६ मे,२००९ चे**

**परिशिष्ट "अ"**

**<u>UNIFORM SPECIFICATION FOR INDIAN WHEAT OF ALL VARIETIES FOR RABI MARKETING SEASON 2008-2009.</u>**

**Wheat shall:**

a) be the dried mature grains of, Triticum vulgare, T.Compactum, T.sphaerococcum, T.duram, T.aestivum and T. dicoccum.
b) have natural size, shape, colour and lustre.
c) be sweet, clean, wholesome and free from obnoxious smell, discolouration, admixture of deleterious substances including toxic weed seeds and all other impurities except to the extent indicated in the schedule below.
d) be in sound merchantable condition.
e) not have any admixture of Argemone mexicana and Lathyrus sativus (khesari) in any form, colouring matter, and any obnoxious, deleterious and toxic material.
f) Conform to PFA Rules.

Schedule showing the maximum permissible limits of different refractions in Fair Average Quality of Wheat.

| Foreign matters. % | Other Foodgrains % | Damaged grains % | Slightly damaged grains % | Shrivelled & broken grains. % |
|---|---|---|---|---|
| 0.75 | 2.00 | 2.00 | 6.00 | 7.00 |

**Note:**

1. Moisture in excess of 12% and upto 14% will be discounted at full value Stocks containing moisture in excess of 14% are to be rejected.

2. Within the overall limit specified for foreign matter, the poisonous weed seeds shall not exceed 0.4% of which Dhatura and Akra (Vicia species) shall not be more than 0.025% and 0.2% by weight respectively.

3. Kernels with glumes will not be treated as unsound grains during physical analysis the glumes will be removed and treated as organic foreign matter.

4. Within the overall limit specified for damaged grains, ergot affected grains shall not exceed 0.05%.

**5. In case of stocks having infestation, a cut at the rate of Rupee one per quintal may be charged as fumigation charges.**

**6. For weevilled grains determined by count, following price cuts, in addition to other cuts, if any will be imposed.**

- **i) from the beginning of the season till end of August, the rate of cut will be @Rs.1./ - per qtls, for every 1% or part thereof.**
- **ii) from 1 st September till end of October, no cut will be imposed upto 1% while for any excess, the cut will be @ Rs.1/- per quintal for every 1% or part thereof.**
- **iii) from 1st November till end of the season no cut will be imposed upto 2% while for any excess, the cut will be @ Rs.1/- per qtl, for every 1% or part thereof.**
- **iv) stocks containing weevilled grains in excess of 3% will be rejected.**

**Method of Analysis**

**As given in Bureau of Indian Standard No. IS:4333 (Part I and II) 1967 and as amended from time to time except for weevilled grains which are to be determined by count method.**

**Definition of Refractions : As contained in BIS Specifications No.2813 -1995.**

---------------------------

शासन निर्णय क्रमांक **खरेदी-१००८/प्र.क्र.४१०१/ना.पु.२९, दिनांक २६मे,२००९ चे**

**परिशिष्ट "ब"**

**हमी भाव योजनेखाली एफ. ए. क्यू. दर्जाच्या गहू खरेदीबाबतचा साप्ताहिक अहवाल नमुना.**

१) जिल्हयाचे नांव : - --------------------------------

२) मागील शनिवार :- -----------------------------------------( आकडे क्विंटलमध्ये )
दिनांक ----------------------अखेर गहू
झालेली एकूण खरेदी एफ. ए. क्यू. ---------------------------

३) मागील शनिवारी दिनांक ---------------------अखेर झालेली एकूण खरेदी.

४) अडचणी असल्यास --------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

शासन निर्णय क्रमांक **खरेदी-१००८/प्र.क्र.४१०१/ना.पु.२९, दिनांक २६ मे,२००९ चे परिशिष्ट "क"**

क्रमांक : संकीर्ण- १२९८/२८१५/प्र.क्र.२५७९/ना.पु.२९,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, १९९८.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून )
सर्व अपर जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
नियंत्रक शिधावाटप, मुंबई.
संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.

विषय : **खुल्या जागेत शास्त्रोक्त पध्दतीने अन्नधान्याची साठवणूक करण्याबाबत संहिता.................**

राज्यात वेळोवेळी आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत तसेच लेव्ही आदेशातंर्गत अन्नधान्याचे प्रापण करण्यात येते. अशाप्रकारे खरेदी करण्यात येणारे अन्नधान्य शासकीय किंवा भाडयाने घेतलेल्या गोदामात सुरक्षिताणे साठविण्यात येते. त्या अन्नधान्याच्या सुरक्षिततेविषयी दयावयाच्या खबरदारीची संहिता यापूर्वीच विहित करण्यात आली आहे.

२. काही विशिष्ट परिस्थितीत शासनाच्या ताब्यात असलेले अन्नधान्य गोदामात साठविणे शक्य झाले नाही (गोदामात जागा नसल्यामुळे) व त्यामुळे असे अन्नधान्य खुल्या जागेत (cover and plinth) साठवावे लागल्यास, त्यावेळी संभाव्य नुकसान टाळून अन्नधान्याची शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक करण्याबाबतची उपरोक्त उपयोजन संहिता केंद्र शासनाने निश्चित केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे :-

(१) खुल्या आवारात ( Cover and plinth ) साठवणूकीसाठी निवडलेल्या जागा हया उंच जोत्याच्या, (High Plinth Area) विशेषतः पक्क्या बांधकामाच्या असाव्यात. पुरेसा निचरा होणा-या असाव्यात. जोत्याच्या बांधकामामध्ये तडे गेलेले नसावेत किंवा भेगा नसाव्यात. अशा आवारांच्या सभोवती अनावश्यक रानटी वनस्पती नसाव्यात आणि अशा जागा सुलभ रस्त्यांनी जोडलेल्या व पुरेशा सुरक्षित असाव्यात.

(२) खुल्या आवारातील (cover and Plinth ) साठवणूक करताना योग्य डनेजच्या (लाकडी ठोकळे, दगडी लाद्या,इत्यादी) वापर करावा.

(३) अन्नधान्याचे निरिक्षण करण्यासाठी तसेच कीटकांच्या नियंत्रणाचे उपाय योजण्यासाठी जोत्याच्या भोवती पुरेशा मार्गिका व जागा असाव्यात.

(४) थप्प्या हया प्रमाणशीर आकाराच्या, उंचीच्या आणि घुमटाकार असाव्यात. त्यामुळे आवरणाचा फुगा होणे ( Balooning of Cover ) तसेच थप्प्याच्या वर पाणी साठणे टाळता येईल.

(५) उंदिराच्या बंदोबस्ताची काळजी वेळच्यावेळी घेण्यात यावी. उंदीर नियंत्रणासाठी ॲल्यूमिनियम फॉस्फाईडच्या गोळयांच्या (०.६ ग्रॅमच्या दोन गोळया प्रत्येक जिवंत बिळासाठी) वापर करावा. झिंक फॉस्फाईडचा सुध्दा अमिषाच्या माध्यमातून वापर करता येईल.

(६) पक्ष्यांपासून अन्नधान्याच्या सुरक्षिततेची पुरेशी काळजी घेण्यात यावी.

(७) पुरेशा प्रकाशाच्या दिवशी योग्य वायुविजन असणे अन्नधान्यातील आर्द्रता कमी करण्यासाठी उपयुक्त ठरते.

(८) पावसापासून अन्नधान्याचे रक्षण करण्यासाठी खुल्या आवारातील (Covers and Plinth) साठवणीच्या थप्प्या पॉलिथिनच्या आवरणाने आणि नॉयलॉनच्या जाळयांनी आच्छादित कराव्यात व आच्छादने नायलॉनच्या दोराने बांधावीत.

(९) खुल्या आवारात (Covers and Plinth ) साठविलेल्या अन्नधान्यास ५० टक्के मॅलाथिऑन फवारुन २.५ टक्के डेस्टामेथ्रीन पावडरच्या सहाय्याने तसेच ॲल्युमिनियम फॉस्फाईडच्या गोळयांच्या सहाय्याने धुरीकरण करुन अन्नधान्याच्या साठवणूकीतील किडीपासून संरक्षण करावे.

(१०) वा-याच्या वेगामूळे किंवा इतर कारणाने आवरणाची हानी झाल्यास तात्काळ उपयोगासाठी काळया पॉलिथिन आवरणाचा व नायलॉनच्या दोराचा पुरेसा साठा ठेवण्यात यावा.

(११) खुल्या आवारात (Cover and Plinth ) साठविलेल्या धान्याचे प्राथम्याने नियतन द्यावे/वितरण करावे.

३. भविष्यात अशाप्रकारे अन्नधान्याची खुल्या जागी (Open place) साठवणूक करावी लागल्यास त्या अन्नधान्याचे नुकसानीपासून रक्षण करण्यासाठी उपरोक्त परिच्छेद -२ मध्ये विहित केलेल्या उपयोजन संहितेचे पालन करण्यात यावे.

४. याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात व त्याचे पालन होत असल्याची खात्री करण्यात यावी.

सही/-
( श्या. द. शिंदे )
उप सचिव,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रत अग्रेषित -

१) महाराष्ट्र राज्य पणन महासंघ, मुंबई.

२) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

३) सर्व कार्यासने, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

शासन निर्णय क्रमांक **खरेदी-१००८/प्र.क्र.४१०१/ना.पु.२९, दिनांक २६ मे,२००९ चे परिशिष्ट"ड "**

**तात्काळ / महत्वाचे** **फॅक्स/ई मेल/ टपाल**

क्रमांक : खरेदी१००८/१६८९/प्र.क्र.४१२८/ना.पु.२९
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६ डिसेंबर, २००८.

प्रति,

१) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि.,
कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई-४०० ००९.
२) व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक-२.
३ सरव्यवस्थापक (महाराष्ट्र)
भारतीय अन्न महामंडळ,धिरज अरमा, २ रा माळा, अनंत काणेकर मार्ग,
बांद्रा (पूर्व) , मुंबई-४०० ०५१.
४) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).

विषय :- **लेव्ही तांदूळ व CMR तांदूळासाठी "Colour Coding" केलेल्या गोण्याचा वापर करण्याबाबत...**

केंद्र शासनाच्या पत्र क्रमांक १५(१०)/२००३-PY.III, दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ अन्वये **खरीप पणन हंगाम/रब्बी पणन हंगाम २००९-२०१०** साठी लेव्ही तांदूळ व सीएमआर तांदूळ साठविण्यासाठी **लाल रंगाने** कोडींग (Red Colour Coding) केलेल्या गोण्याचा वापर करण्याबाबत निदेश आहेत. तसेच गत खरीप/रब्बी हंगामात शिल्लक राहीलेल्या व **हिरव्या रंगाने** कोडींग केलेल्या नवीन गोण्या वापरण्यात आल्या नसतील तर त्या गोण्या या हंगामात (२००९-२०१०) वापरण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

सबब, वर नमूद केल्याप्रमाणे, खरीप पणन हंगाम २००९-२०१० मध्ये भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करण्यात येणाऱ्या लेव्ही तांदूळ व सीएमआर तांदूळासाठी **लाल रंगाने** कोडींग (Red Colour Coding) केलेल्या गोण्याचा वापर करण्याबाबत दिलेल्या सविस्तर / स्वयंस्पष्ट सूचना विचारात घेऊन, पुढील कार्यवाही कृपया करावी.

सही/-

**( नी. सू. बन्सोड)**
अवर सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत,

१) सर्व विभागीय आयुक्त,/ २) सर्व उप आयुक्त (पुरवठा)

३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी ४) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

६) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.

८) कृषी व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई. ९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) सर्व कार्यासने (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग),मंत्रालय, मुंबई.

११) निवड नस्ती (नापु-२९) .

No.15(10)/2003-Py.III
Government of India
Ministry of Food, Consumer Affairs & Public Distribution
Department of Food & Public Distribution

Krishi Bhawan, New Delhi
Dated the 26th November, 2008.

To,

Secretary,
Food & Supplies Department,
Government of Andhra Pradesh, Assam, Bihar, Chattisgarh, Gujarat, Haryana, Himachal Pradesh, Jammu & Kashmir, Jharkhand, Karnataka, Madhya Pradesh, Maharashtra, Nagaland, Orissa, Punjab, Rajasthan, Tamil Nadu,Uttaranchal,Uttar Pradesh, West Bengal and Andaman& Nicobar Islands,Chandigarh, Delhi & Pondicherry.

Sub : **Colour Coding of Gunny bags to facilitate identification of crop-year of stock for RMS 2009-10 and KMS 2009-10**.

Sir,

I am directed to say that it has been decided to adopt Red Colour Coding for gunny bags for RMS 2009-10 and KMS 2009-10. The colour coding will be in the manner indicating below :-

1.Colour coding or indetification marking on every bag at a distance of about 150 mm away from any one side of the selvedge shall be in "Red" colour;

2.Stencil or Branding as per indentors' requirements shall be in "Blue" colour;

3. Marking or Stitching on the mouth of the bag after filling the grain will be done by the FCI/State Agencies in "Red" colour;

4. A single blue stripe running along the length of the bag at the centre shall be kept unchanged.

The States having left over new gunnies not utilized during the previous RMS/KMS with Green Colour marking will also allowed to utilize the same during KMS 2008-09.

Yours faithfully,
Sd/-
**( K.C.Yadav )**
**Under Secretary to the Government of India**
**Tele No.23384448**

Copy to :-

1.Chairman, FCI, New Delhi. 2. E.D. (General). FCI, New Delhi.
3.E.D. (Procurement). FCI, New Delhi. 4. D.D.(QC), Deptt. of F& PD,New Delhi.

5. DG, DGS&D, New Delhi.
6. Jute Commissioner, Kolkata.
7. Chairman, IJMA, Kolkata.
8. DDG, DGS&D, Kolkata.

***********